(335)

No. BMRDA/MTG/17.

Bombay Metropolitan Region
Development Authority.
18th floor, New Administrative
Building, Madame Cama Road,
Opp. Mantralaya, Bombay-400 032

Date :- 30th March, 1979.

The minutes of the 17th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on Saturday, the 10th March, 1979, are enclosed.

Staff Officer-(II),
Central Office.

To :
All Members and Permanent Invitees.
The Officers of the B.M.R.D.A.

क्रमांक: बीएम्आरडीए/एम्टीजी/१७.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
१८ वा माळा, नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा रोड, मंत्रालयसमोर.

दिनांक :- ३० मार्च, १९७९.

प्राधिकरणाच्या दिनांक १० मार्च १९७९ रोजी भरलेल्या १७ व्या सभेच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे.

कार्यासन अधिकारी(२).

प्रति :
सर्व सदस्य व कायम निमंत्रित.
प्राधिकरणाचे अधिकारी.

नशहो/३०३७९.

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १७ व्या सभेचे कार्यवृत्त

दिनांक : १० मार्च, १९७९.

वेळ : सकाळी १० वाजता

सभास्थान : मंत्रालय (अनेक्स) येथे ६ व्या मजल्यावरील सभागृह

सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांची आणि निमंत्रितांची यादी सोबत जोडली आहे. (जोडपत्र-'अ')

२. अध्यक्षांच्या भाषणाने सभेस प्रारंभ झाला. भाषणाची प्रत सोबत जोडली आहे (जोडपत्र-'ब').

3. कै. श्री. एच्. एम्. वांगारे आणि डॉ. एम्. जी. पळुळेकर यांनी केलेल्या सेवेची गौरवपूर्ण नोंद घेणारे ठराव संमत करण्यात आले. (जोडपत्रे-'क' व 'ड')

४. त्यानंतर कार्यसूचीवरील बाबी विचारार्थ घेण्यांत आल्या.

बाब क्र. १ : दिनांक २६ सप्टेंबर १९७८ रोजी घेण्यांत आलेल्या या पूर्वीच्या (१६व्या) सभेच्या कार्यवृत्तास पुष्टी :

खालील गोष्टीस अधीन राहून कार्यवृत्तास पुष्टी देण्यांत आली.

मागील सभेच्या कार्यवृत्ताच्या मराठी तर्जुम्यास उल्लेखून श्री. सोनुभाऊ बसवंत म्हणाले की, प्रकल्प बाधित स्थानिक लोकांच्या पुनर्वसनाबाबत आपण मागील सभेत केलेल्या मागणीचा उल्लेख कार्यवृत्ताच्या मराठी तर्जुम्यात करण्यांत आलेला नाही. चर्चेनंतर असे मान्य करण्यात आले की, बाब क्रमांक २ बाबत कार्यवृत्ताच्या मराठी तर्जुम्यात जेथे जेथे नव्या मुंबईच्या विकासासाठी भूसंपादन बाधित व्यक्तींच्या पुर्नवसनाचा उल्लेख असेल तेथे तेथे प्रकल्पबाधित स्थानिक लोकांच्या पुर्नवसनांचाही उल्लेख करण्यांत यावा.

त्यानंतर कार्यवृत्तास पुष्टी देण्यांत आली.

बाब क्र. २ : २६ सप्टेंबर १९७८ रोजी झालेल्या मागील (१६व्या) सभेच्या कार्यवृत्तावर करण्यांत आलेली कार्यवाही.

करण्यांत आलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

बाब क्र. ३ : प्रादेशिक योजनेत फेरबदल-दिनांक १५ मार्च १९७८ ची शासकीय अधिसूचना क्रमांक आरपीबी ११७८/२८७-युडी-५

महानगर उपआयुक्तांनी सदस्यांना प्रस्ताव थोडक्यांत विशद करुन सांगितले. जी झोन मधील गावांतील लघु उद्योग धंद्याबाबत आणि जी झोन मधील कांही भागांचे निवासी विभागांत परिवर्तन करण्याबाबतच्या योजनेच्या तरतुदी शिथिल करण्याबाबतच्या प्रस्तावांचा आणखी अभ्यास होणे आवश्यक आहे, असे कांही सदस्यांना वाटले. प्रस्तावाशी संबंधित क्षेत्राबाबत आणखी कांही माहिती आवश्यक आहे असेही त्यांना वाटले. चर्चेनंतर असे मान्य करण्यांत आले की, अशासकीय सदस्यांची आणि प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची अनौपचारिक बैठक घेऊन तेथे या प्रस्तावांची चर्चा करण्यांत यावी. त्यावेळी लोकसंख्या वहातुक आणि संबंधित विभागात जे उद्योगधंदे सुरु करण्यास परवानगी मिळेल असे उद्योगधंदे याबाबतची आवश्यक माहितीही पुरविण्यात येईल. अनौपचारिक चर्चेनंतर प्राधिकरणाच्या विचार विनियमासाठी प्राधिकरणाच्या या पुढील सभेपुढे एक टिप्पणी ठेवण्यात येईल.

बाब क्र. ४/.......

बाब क्र ४ : १९७९–८० चा कार्यक्रम

प्राधिकरणाने कार्यसूची टिप्पणीवर विचार विनिमय केला. १९७९–८० च्या कार्यक्रमात खालील प्रस्तावांचाही समावेश करण्यात यावा अशी सूचना सदस्यांनी केली.

१. पाणी पुरवठा :

१) हेटवणे धरण प्रकल्प.

२) बारवी प्रकल्पाच्या जल वाहिनीच्या दुतर्फा १ ते ११ किलोमीटर टापूतील २५ खेडयांना पाणी पुरवठा.

३) वसई, विरार, भिवंडी, भायंदर आणि पडघे या गावाना पाणी पुरवठा.

२. परिवहन आणि दळणवळण

अ) खालील गावांसाठी स्थानक क्षेत्र रहदारी सुधारणा योजना –

१) ठाणे

२) कल्याण

३) नालासोपारा

४) विरार

ब) भिवंडी शहराचा उपमार्ग वाढवणे

क) सांताक्रुझ – चेम्बूर जोडमार्गावर पूल.

सदस्यांनी केलेल्या विविध सूचना तपासून १९७९–८० च्या कार्यक्रमांत आणखी कांही बाबींचा समावेश करणे शक्य झाल्यास सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने तसे करण्यात येईल असे आश्वासन महानगर आयुक्तांनी सदस्यांना दिले.

प्राधिकरणाने नंतर खालील ठराव संमत केला.

ठराव क्र. १५४ : असा ठराव करण्यात येत आहे की –

अ) कार्यसूची टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे १९७९–८० च्या वार्षिक कार्यक्रमास मान्यता देण्यात येत आहे, आणि

ब) वार्षिक कार्यक्रमात समाविष्ट करण्यांत आलेल्या योजनांच्या तपशिलास मान्यता देण्याचा अधिकार स्थायी समितीस देण्यात येत आहे.

बाब क्र. ५ : १९७९–८० च्या अर्थसंकल्पास मान्यता अपेक्षित धरुन खर्च करण्यास अधिकार देणे

प्राधिकरणाने कार्यसूची टिप्पणीवर विचार विनिमय केला. यापुढे अर्थसंकल्पिय अंदाज विहित वेळी प्राधिकरणास सादर करण्यात येईल असे आश्वासन सदस्यांस देण्यांत आले. प्राधिकरणाने नंतर खालील ठराव संमत केला.

ठराव क्र. १५५ : असा ठराव करण्यात येत आहे की, १९७९–८० च्या अर्थसंकल्पीय अंदाजास प्राधिकरणाची मान्यता मिळेल अशी अपेक्षा करुन, मंजूर झालेल्या पदांवर, चालू योजनांवर आणि

प्राधिकरणाच्या/

प्राधिकरणाच्या कामकाजाच्या दैनंदिन कारभारावर मुंबई महानगर प्रदेश विकास निधितून खर्च करण्यास महानगर आयुक्तांस प्राधिकरण अधिकार देत आहे."

बाब क्र.६ : १९७७-७८ चा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा वार्षिक अहवाल.

प्राधिकरणाने कार्यसूची टिप्पणीवर विचार विनिमय करुन खालील ठराव संमतकेला.

ठराव १५६ : "असा ठराव करण्यात येत आहे की, १९७७-७८ च्या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वार्षिक अहवालाच्या मसुद्यास प्राधिकरण मान्यता देत असून तो राज्य शासनास सादर करण्यास महानगर आयुक्तांस अधिकार देत आहे."

बाब क्र.७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम १३अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिसूचना

प्राधिकरणाने कार्यसूची टिप्पणीवर विचार विनिमय केला. अध्यक्षांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिसूचनेचा अभिप्रेत अर्थ आणि १० जून १९७९ पासून पुढे १वर्ष अधिसूचनेची मुदत वाढविण्याच्या प्रस्तावाची निकड स्पष्ट करुन सांगितली. त्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव संमत केला.

ठराव क्र १५७ : असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम १३ चे पोट-कलम (१)यान्वये असलेले अधिकार आणि याबाबत त्यास सहाय्यभूत असलेले इतर सर्व अधिकार वापरुन अधिसूचना काढण्यास प्राधिकरण मान्यता देत असून आणि उक्त अधिनियमाचे कलम ७अ अन्वये असलेले अधिकार वापरुन यथायोग्य रीत्या महानगर आयुक्तांनी अधिप्रमाणित केलेली उक्त अधिसूचना महाराष्ट्र शासकीय राजपत्रांत छापून आणण्यास त्यांना अधिकार देण्यांत येत आहे."

बाब क्र.८ : डोंबिवली स्थानक क्षेत्र रहदारी सुधारण योजना-प्रकल्प अहवाल.

प्राधिकरणाने कार्यसूची टिप्पणीवर विचार विनिमय केला.(कार्यसूची टिप्पणीचा परिच्छेद ९च्या जागी सभेत प्रसूत करण्यांत आलेली दुरुस्ती ठेवण्यांत आली.) सदस्यांनी प्रस्तावाचे स्वागत केले. प्राधिकरणाने नंतर खालील ठराव संमत केला.

ठराव १५८ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम १२ पोटकलम (१) चा खंड (क) आणि कलम २१ अ,अन्वये प्रदान केलेले अधिकार व तसेच याबाबत सहाय्यभूत असलेले इतर अधिकार वापरुन प्राधिकरण याद्वारे खालील ठराव संमत करीत आहे.

१) कार्यसूची टिप्पणीस जोडलेल्या प्रकल्प अहवालात तपशीलवार वर्णिलेली, स्थानक क्षेत्र रहदारी सुधारणा योजना, डोंबिवली रेल्वे स्थानक, या योजनेस मान्यता देण्यांत येत आहे.

२) एकात्मीकृत नगर विकास योजनेन्वये, वित्तिय सहाय्य देण्यासाठी या योजनेचा

विचार करण्यास महाराष्ट्र शासनास व भारत शासनास विनंती करण्यांत यावी अशी शिफारस करण्यांत येत आहे.

३) खालील शर्तीस अधीन राहून, डोंबिवली रेल्वे स्थानकाच्या, स्थानक क्षेत्र रहदारी सुधारणा योजनेच्या कार्यवाहीसाठी डोंबिवली नगर-परिषदेस (अंदाजे) २२.५ लाख रुपयांचे कर्ज मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या फिरत्या निधितून मंजूर करण्यांत येत आहे.

अ) डोंबिवली नगरपरिषदेने पार पाडावयाच्या कामांच्या कर्जाच्या भागा-संबंधात (अदमासे रु. १३.६ लाख)-

१) व्याज : द.सा.द.शे. ९ टक्के.

२) कर्जाच्या परतफेडीची मुदत : १० वर्षे

३) हप्ते : महानगर आयुक्त ठरवतील त्यानुसार.

ब) मध्य रेल्वेने पार पाडावयाच्या कामांवरील खर्चासंबंधात कर्जाच्या (अदमासे रु. ८.९ लाख) हिश्यासंबंधी.

१) व्याज : कांही नाही.

२) कर्जाच्या परतफेडीची मुदत : मध्य रेल्वेकडून डोंबिवली नगर-परिषदेला रक्कम प्राप्त झाल्यावर ताबडतोब परतफेड करावी. मात्र डोंबिवली नगरपरिषद आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांमधील कराराच्या तारखेपासून ५ वर्षाहून अधिक काळ कर्जफेडीस लागता कामा नये.

आणखी असाही ठराव करण्यांत येत आहे की, डोंबिवली नगरपरिषदेच्या सल्ल्याने कर्जाच्या इतर अटी आणि शर्ती ठरविण्याचा अधिकार महानगर आयुक्तांना देण्यांत येत आहे.

<u>बाब क्र.९ :</u> <u>क्षेत्र विकास योजना, पंचपाखाडी, जिल्हा ठाणे, या योजनेसाठी भूसंपादन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्थावर मालमत्ता समितीचा निर्णय.</u>

प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्थावर मालमत्ता समितीच्या अहवालाची नोंद घेतली.

बाब क्र.१० : <u>मुंबई महानगर प्रदेशाच्या बाह्य क्षेत्रांचा विकास</u>

बृहन्मुंबईबाहेरील मुंबई महानगर प्रदेशाच्या क्षेत्रांना देण्यांत आलेल्या सहाय्य-विषयक अहवालाची प्राधिकरणाने नोंद घेतली.

बाब क्र.११ / ..........

बाब क्र.११ : संभाव्य जलसंपत्ती आणि तिचे वितरणाचा अभ्यास.

प्राधिकरणाने कार्यसूची टिप्पणीवर विचार विनिमय केला.जलसंपत्ती व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष श्री.एन्.जी.के.मूर्ती यांनी मुंबई महानगर प्रदेशाच्या जल-संपत्तीच्या वाटपाबाबतच्या प्रस्तावाचे आणि या प्रदेशातील जलविषयक मागणी भागविण्या-साठी करावयाच्या कामाच्या प्राधान्याचे स्पष्टीकरण केले.प्राधिकरणाने नंतर खालील ठराव संमत केला.

ठराव १५९ : "असा ठराव करण्यांत येत आहे की,कार्यसूची टिप्पणीचा परिच्छेद ११.२३ मध्ये शिफारस करण्यांत आल्याप्रमाणे जलसंपत्तीचे वाटप करण्यास आणि या कार्यसूची टिप्पणीचे परिच्छेद ११.२४ आणि ११.२५ मध्ये दिलेल्या प्राधान्यक्रमाने,मुंबई महानगर प्रदेशाची १९९१ ची मागणी भागविण्यासाठी प्रकल्पाचे सर्वेक्षण आणि संशोधनास वित्तसहाय्य देण्यास मान्यता देण्यांत येत असून पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी शासनास शिफारस करण्यांत येत आहे."

बाब क्र.१२ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (स्थायी समितीच्या निवडणुका) (दुरुस्ती)विनियम १९७८.

प्राधिकरणाने कार्यसूची टिप्पणीवर विचार विनिमय केला.आणि खालील ठराव संमत केला.

ठराव १६० : सन १९७४ चा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४चे कलम ५० ने प्रदान केलेले आणि याबाबत त्यास सहाय्यभूत असलेले सर्व इतर अधिकार वापरुन प्राधिकरण याव्दारा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (स्थायी समितीच्या निवडणुका)(दुरुस्ती) विनियम करीत आहे.

बाब क्र.१३ : स्थायी समितीच्या निवडणुका

स्थायी समितीवरील ४ रिकाम्या जागा भरण्यासाठी घ्यावयाच्या निवडणुका प्राधिकरणाने लांबणीवर टाकल्या.

बाब क्र.१४ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाचा समावेश

प्राधिकरणाने कार्यसूची टिप्पणीवर विचार विनिमय केला.आणि खालील ठराव संमत केला.

ठराव १६१ : असा ठराव करण्यांत येत आहे की,कर्जविषयक कराराचे परिशिष्ट २ मध्ये देण्यांत आलेले 'प्रकल्पाचे वर्णन' मध्ये भाग-अ खाली परिच्छेद (६) ची भर घालून दुरुस्ती करण्यांत यावी. या प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत आहे.तो परिच्छेद खालीलप्रमाणे आहे.

"(६) धारावी बस........ /

"(६)धारावी बस आगार आणि वडाळा अवजड कार्यशाळेसाठी मुंबई महानगर पालिकेकडून प्रवेश मार्गाचे बांधकाम "

पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्तांना याव्दारा जागतिक बँकेच्या सल्ल्याने कर्जविषयक करार दुरुस्त करण्यासाठी आणि दुय्यम कर्जविषयक करारात आवश्यक तो बदल करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यास अधिकार देण्यात येत आहे.

बाब क्र. १५ : वांद्रे-कुर्ला समूहातील कुर्ला टेकडीचा पिकनिक स्पॉट म्हणून विकास करणे प्राधिकरणाचे सदस्य श्री एकनाथ कोपर्डे यांची सूचना.

सूचनेची नोंद घेण्यात आली.

बाब क्र. १६ : मीरा-भायंदर समूहासाठी विभाग योजनेची सुधारणा

प्राधिकरणाने कार्यसूची टिप्पणीवर विचार विनिमय केला. महानगर आयुक्तांनी असे प्रतिपादन केले की, सद्य: परिस्थितीत पाणी पुरवठ्यात वाढ करणे महानगर पालिकेस शक्य होणार नाही. त्यांनी असेही निवेदन केले की, मीरा-भायंदर समूहाच्या पाणीपुरवठ्यात वाढ करण्याबाबतच्या प्रस्तावाची छाननी अद्याप पूर्ण झालेली नाही. महानगर आयुक्तांनी असे स्पष्टीकरण केले की, मीरा-भायंदर समूहाच्या (बाब क्र. १६ चे जोडपत्र) सुधारित विभागीय योजनेवरील अहवालात म्हटल्याप्रमाणे हया क्षेत्रासाठी चेणे येथील संकल्पित जलाशयातून पाणी पुरवठा करण्याचा विचार आहे. महानगर आयुक्तांनी पुढे असाही खुलासा केला की, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १६ अन्वये मीरा-भायंदर समूहासाठी प्रादेशिक योजनेत अंशत: सुधारणा करावी अशी सूचना मूळ प्रस्तावात अभिप्रेत होती. असे करण्यास बराच वेळ लागला असता. सभास्थानी प्रसृत करण्यात आलेल्या ठरावाच्या सुधारित मसुद्यानुसार प्राधिकरणाने विभाग योजनेच्या सुधारित मसुद्यास मान्यता देण्यात यावी असे सुचविले होते. त्यानंतर उक्त महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २०(२)अन्वये प्रस्तुत प्रस्ताव हा एक दुय्यम फेरबदल म्हणून हाती घेण्यात यावा अशी विनंती राज्य शासनाला करण्यात येईल त्यानंतर उक्त कलम २०(२) मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार हरकती आणि सूचना मागवून राज्य शासन सुधारित योजनेस त्वरेने अंतिम स्वरुप देवू शकेल.

त्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव संमत केला.

ठराव १६२ : "असा ठराव करण्यात येत आहे की, कार्यसूची टिप्पणी क्र. १६ व त्यासोबत जोडलेले कागदपत्र याबाबत विचारविनिमय करुन दिनांक २ जून १९७३ च्या क्र. आरपीबी ११७३/११३६-आरपीसी च्या शासकीय अधिसूचनेनुसार राज्य शासनाने मान्यता दिलेल्या मुंबई महानगर प्रदेशाच्या प्रादेशिक योजनेत, मीरा-भायंदर समूह म्हणून वर्णिलेल्या आणि विशेषत

सभागृहापुढे......./

सभागृहापुढे ठेवण्यांत आलेल्या नकाशावर सीमित केलेल्या भागापुरता फेरबदल करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे."

"पुढे असाही ठराव करण्यांत येत आहे की, वरील फेरबदल करण्याबाबत सहमत असल्यास, राज्य शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २० चे पोटकलम(२) अन्वये असलेले अधिकार वापरुन वर निर्देश केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेशाच्या प्रादेशिक योजनेत प्रस्तावित फेरबदल करावेत, अशी राज्य शासनास शिफारस करण्यांत यावी."

"पुढे असाही ठराव करण्यांत येत आहे की, याबाबत राज्य शासनास विनंती करण्यास महानगर आयुक्तांस याव्दारे अधिकार देण्यांत येत आहे."

बाब क्र.१७ : नव्या मुंबईत तुर्भे येथे कृषि उत्पन्न बाजार पेठेकरिता जमिनीचे पुन:प्रापण आणि इतर प्रारंभिक सुखसोयींच्या कामासाठी सिडकोला आगाऊ रकमा देणे.

बाबीची नोंद घेण्यांत आली.

बाब क्र.१८ : थळ-वायशेत येथील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनेच्या कार्यवाहीसाठी महाराष्ट्र पाणी पुरवठा आणि मलोत्सर्ग मंडळाला कर्ज

प्राधिकरणाने कार्यसूची टिप्पणीवर खालील ठराव संमत केला.

ठराव १६३ : असा ठराव करण्यांत येत आहे की, अलिबागनजीक थळ-वायशेत येथील संकल्पित खत कारखाना समूहाच्या तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणीसाठी दर सहा महिन्यानी द्यावयाच्या १०% व्याजाच्या दराने महाराष्ट्र पाणी पुरवठा व मलोत्सर्ग मंडळाला रु.४५ लाख मंजूर करावे. कर्जाची परतफेड १९७९-८० पासून १९८२-८३ पर्यंत ४ वार्षिक हप्त्यानी करावयाची आहे."

---

जोडपत्र - 'अ'

दिनांक १० मार्च १९७९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १७ व्या सभेस उपस्थित असलेले सदस्य.

| | |
|---|---|
| श्री. हशू अडवानी<br>नगर विकास आणि मुंबई<br>महानगर प्रदेश विकास प्राधिकरण<br>मंत्री. | अध्यक्ष. |
| श्री. राजाभाऊ चिम्बुलकर.<br>मुंबईचे महापौर | उपाध्यक्ष |
| श्रीमती. ताराबाई वर्तक<br>अध्यक्षा, ठाणे जिल्हा परिषद. | सदस्य |
| श्री. टी. एच्. वाजेकर.<br>अध्यक्ष, कुलाबा जिल्हा परिषद | सदस्य |
| श्री. के. पी. छाबरिया.<br>अध्यक्ष, बीईएसटी समिती<br>मुंबई महानगर पालिका. | सदस्य |
| श्री. एकनाथ आर्. कोपर्डे.<br>मुंबई महानगर पालिका सदस्य. | सदस्य |
| श्री. बी. डी. झुटे.<br>मुंबई महानगर पालिका सदस्य. | सदस्य |
| श्री. विनायक जी. धारप.<br>मुंबई महानगर पालिका सदस्य | सदस्य |
| श्री. अमरनाथ डब्ल्यू. पाटील.<br>मुंबई महानगर पालिका सदस्य. | सदस्य |
| श्री. सी. सी. भुजबळ.<br>मुंबई महानगर पालिका सदस्य. | सदस्य |
| श्री. अलीमोहमद उमर मेमन.<br>मुंबई महानगर पालिका सदस्य | सदस्य |
| श्री. एस्. डब्ल्यू. पटवारी.<br>अध्यक्ष, डोंबिवली नगर परिषद | सदस्य |
| श्री. डी. के. बानविलकर.<br>अध्यक्ष, कुलाबा जिल्हा परिषद | सदस्य |
| श्री. व्ही. के. पाटील.<br>अध्यक्ष, पंचायत समिती, भिवंडी. | सदस्य |
| श्री. गजानन एम्. कोळी.<br>विधान सभा सदस्य. | सदस्य |

श्री....../

| | |
|---|---|
| श्री. डी. एन्. पाटील,<br>विधान सभा सदस्य, | सदस्य |
| श्री. एस्. डी. बसवंत,<br>विधान परिषद सद | सदस्य |
| श्री. डी. बी. मुळे,<br>विधान परिषद सदस्य, | सदस्य |
| श्री. एल्. एस्. लुल्ला,<br>मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. बी. के. चौगुले,<br>बृहन्मुंबई महानगर पालिका<br>आयुक्त. | सदस्य |
| श्री. एम्. एम्. वागळे,<br>महाव्यवस्थापक, मुंबई दूरध्वनी. | सदस्य |
| श्री. एन्. जी. के. मूर्ती,<br>अध्यक्ष, जलसंपत्ती व्यवस्थापन<br>मंडळ, मुंबई महानगर प्रदेश<br>विकास प्राधिकरण | सदस्य |
| श्री. एम्. एस्. पळनिटकर,<br>महानगर आयुक्त, मुंबई<br>महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | सदस्य-सचिव, |

निमंत्रित

महाव्यवस्थापक, सिडको लि.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास
महामंडळ.

सचिव, महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग.

नवंहो/303

जोडपत्र-'ब'

## १० मार्च १९७९ ची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची सभा

### अध्यक्षांचे भाषण

प्राधिकरणाच्या प्रस्तुत १७ व्या सभेस उपस्थित असलेल्या आपणा सर्वांचे स्वागत करतांना मला आनंद होत आहे. या पूर्वीची सभा २८ सप्टेंबर १९७८ रोजी झाली. अशासकीय सदस्यांच्या अनेक रिकाम्या जागा प्रथम भरावयाच्या असल्यामुळे ही सभा बोलाविण्यास अटळ विलंब झाला.

२. मागील सभेनंतर प्राधिकरणाच्या रचनेत बदल झाले आहेत. प्राधिकरणाच्या खालील नवीन सदस्यांचे मी या प्रसंगी स्वागत करीत आहे.

| | |
|---|---|
| १. श्री. आर्. के. चिम्बुलकर. | - महापौर आणि प्राधिकरणाचे उपाध्यक्ष |
| २. श्री. प्रभाकर डी. निकळंकर | - अध्यक्ष, सुधार समिती. |
| ३. श्री. के. पी. छाबरिया. | - अध्यक्ष, बीईएसटी समिती. |
| ४. श्री. एकनाथ रामचंद्र कोपर्डे | - मुंबई महानगर पालिका सदस्य. |
| ५. श्री. व्ही. जी. धारप. | - मुंबई महानगर पालिका सदस्य. |
| ६. श्री. ए. यू. मेमन | - मुंबई महानगर पालिका सदस्य. |
| ७. श्री. आर्. पी. लाड | - मुंबई महानगर पालिका सदस्य. |
| ८. श्री. सी. सी. भुजबळ | - मुंबई महानगर पालिका सदस्य. |
| ९. श्री. डी. जी. कामत | - विधान सभा सदस्य. |
| १०. श्री. दत्तात्रय नारायण पाटील | - विधान सभा सदस्य. |
| ११. श्री. टी. एच्. वाजेकर | - अध्यक्ष, कुलाबा जिल्हा परिषद. |
| १२. श्री. कृष्णचंद्र | - महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे. |
| १३. श्री. के. एस्. रामस्वामी | - महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे. |
| १४. श्री. एम्. एम्. वागळे | - महाव्यवस्थापक, मुंबई दूरध्वनी. |

३. प्राधिकरणाचे आता सदस्य नसलेल्या खालील व्यक्तींनी केलेल्या कार्याबद्दलची मी या प्रसंगी कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

१) श्री. वामनराव महाडीक, महापौर.
२) श्री. सी. आर्. डिकुन्ह.
३) श्री. हंसराज भुग्रा.
४) श्री. सुधीर जोशी.

५).......

५) श्री. एम्. एस्. देवरा.

६) श्री. एम्. ए. बांडवाजी.

७) श्री. एम्. आर्. एन्. मूर्ती. महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे

८) श्री. एम्. जी. पुग्गूस. महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे

९) श्री. एम्. एम्. किनी. महाव्यवस्थापक, मुंबई दूरध्वनी

४. कुलाबा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. एच्. एम्. वांगारे आणि वसई नगर परिषदेचे अध्यक्ष डॉ. एम्. जी. पळुळेकर, यांच्या दु:खद निधनामुळे प्राधिकरण या दोन नामवंत सदस्यांच्या बहुमोल सेवेस मुकले आहेत. हे दोघेही प्रारंभापासूनच प्राधिकरणाचे सदस्य होते. या दोन सदस्यांच्या अकाली निधनाचे आम्हाला तीव्र दु:ख होत आहे. कै. श्री. वांगारे आणि कै. पळुळेकर यांच्या सेवेची मी या ठिकाणी गौरवपूर्ण नोंद घेत आहे.

५. मागील सभेनंतर मुंबई महानगर प्रदेशाच्या दृष्टीने अनेक महत्वपूर्ण घटना घडल्या. या घटनांशी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. या घटनांचा थोडक्यात मी उल्लेख करु इच्छितो.

घाऊक बाजार पेठांचे मुंबई शहराबाहेर स्थलांतर करण्याच्या प्राधिकरणाने मान्य केलेल्या कार्यक्रमाबाबत राज्य शासनाने जे पहिले पाऊल उचलले त्याची सर्व सदस्यांना माहिती आहेच. दिनांक २८ जानेवारी १९७९ रोजी मुख्य मंत्र्यांनी तुर्भे-वाशी येथे नवीन कांदा-बटाटयाच्या घाऊक बाजार पेठेचे उद्घाटन केले. राज्य शासनाने डंकन रोड येथील बाजार पेठेतील व्यवहार बंद केला होता. पण उच्च न्यायालयाच्या न्यादेशाने शासनाच्या आदेशाची कार्यवाही स्थगित करण्यांत आली.

ठाणे, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ या शहरांच्या नगरपालिका क्षेत्रांत आणि महानगर प्रदेशातील सुमारे १०० खेडयांत पाणी पुरवठा करण्यासाठी व्यापक पाणी-पुरवठा आणि मलोत्सर्ग योजना वित्तिय सहाय्यासाठी जागतिक बँकेला सादर करण्यांत आली आहे. आणि ही योजना जागतिक बँक लवकरच मान्य करण्याचा संभव आहे.

शिवाय वडाळा येथील माल वहातूक मोटारीसाठी स्थानक बांधण्याचा प्रकल्प, अंतर्देशीय जल वहातूक प्रकल्प यासारख्या अनेक प्रकल्पांचा प्राथमिक अभ्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हाती घेतला आहे.

वांद्रा-कुर्ला समूहातील जमिनींच्या विकासाची योजना प्रगती पथावर असून प्लॉटसच्या पहिला हप्ता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विक्रीसाठी जाहीर केला आहे.

दुसरी महत्वाची घटना म्हणजे जागतिक बँकेचे अध्यक्ष श्री. मॅकनमारा यांनी ऑक्टोबर १९७८ मध्ये मुंबईस दिलेली भेट ही होय. त्यांच्या मुंबई भेटीच्या अवधीत मुंबई महानगर प्रदेशातील प्राथमिक सुखसोयींच्या विकासासंबंधीचे अनेक प्रकल्प त्यांना सादर करण्यात आले.

त्यांना सादर......./

त्यांना सादर केलेल्या प्रकल्पामध्ये खालील प्रकल्पांचा समावेश होतो. प्रकल्पांची नावे अशी : मुंबई प्रादेशिक नागरी आणि ग्रामीण पाणी पुरवठा प्रकल्प, वडाळा येथील माल वहातुक स्थानक प्रकल्प, कचरा संग्रहण आणि विल्हेवाट प्रकल्प, ठाणे खाडी, उल्हास जल मार्ग प्रकल्प, नवीन मुंबईत लोहमार्गाची सोय करण्यासंबंधी प्रकल्प. हे प्रकल्प सध्या राज्य शासनाच्या विचाराधीन आहेत.

१९७८-८३ च्या राज्य शासनाच्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणासाठी २० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आलेली आहे. ही माहिती सदस्यांना देताना मला आनंद होत आहे

६. सन १९७९-८० चा वार्षिक कार्यक्रम यासारखे कांही महत्वाचे प्रस्ताव सभेसमोरील कार्यसूचीत समाविष्ट करण्यांत आलेले आहेत. आता कार्यसूचीवर विचार विनिमय करण्यांत यावा.

---

895

(35)

जोडपत्र 'क'

## ठराव

प्राधिकरण सदस्य श्री. एच्. एम्. वांगारे यांचे निधन झाले आहे. श्री. एच्. एम्. वांगारे प्राधिकरणाचे प्रारंभापासून सदस्य होते. या काळात त्यांनी प्राधिकरणाच्या कार्यात आणि कारभारात रस घेतला. श्री. एच्. एम्. वांगारे यांनी केलेल्या सेवेची गौरवपूर्ण नोंद आणि त्यांच्या निधनामुळे झालेल्या हानीचीही नोंद या प्रसंगी प्राधिकरण घेत आहे.

जोडपत्र 'ड'

## ठराव

प्राधिकरण सदस्य डॉ. एम्. जी. पखळेकर यांचे निधन झाले आहे. डॉ. एम्. जी. पखळेकर प्राधिकरणाचे प्रारंभापासून सदस्य होते. या काळात त्यांनी प्राधिकरणाच्या कार्यात आणि कारभारात रस घेतला. डॉ. पखळेकर यांनी केलेल्या सेवेची गौरवपूर्ण नोंद आणि त्यांच्या निधनामुळे झालेल्या हानीचीही नोंद या प्रसंगी प्राधिकरण घेत आहे.

359

# MINUTES OF THE SEVENTEENTH MEETING OF THE B.M.R.D.A.

Date : 10th March, 1979.

Time : 10.00 A.M.

Place : Conference Hall, 6th Floor, Mantralaya (Annexe).

A list of members and invitees present is attached (Annexure 'A').

2. The meeting began with an address by the Chairman. A copy of the address is enclosed (Annexure 'B').

3. Resolutions appreciating the services rendered by the late Shri H. M. Wangare and Dr. M.G. Parulekar, were placed on record (Annexures 'C' & 'D').

4. The items on the Agenda were then taken up for consideration.

**Item No. 1 : Confirmation of the minutes of the last (Sixteenth) meeting held on the 26th September, 1978.**

The minutes were confirmed subject to the following :-

Shri Sonubhau Baswant referred to the Marathi version of the minutes of the last meeting and observed that the demand made by him in the last meeting regarding rehabilitation of the local persons affected by the Project had not been brought out in the Marathi version of the minutes. After discussion it was agreed that in the Marathi version of the minutes, under Item No. 2, wherever there is a reference to rehabilitation of the persons affected by the acquisition of land for development of New Bombay, reference should also be made to the rehabilitation of project-affected local persons.

The minutes were then confirmed.

**Item No. 2 : Action taken on the minutes of the last (Sixteenth) meeting held on the 26th September, 1978.**

Action taken was noted.

**Item No. 3 : Modification to the Regional Plan - Government Notification No.RPB 1178/287-UD-5, dated the 15th March, 1978.**

The proposals were briefly explained to the members by

the.......

the Dy. Metropolitan Commissioner. Some members felt that the proposals relating to relaxation of the provisions of the Plan relating to small scale industries in villages in G Zone and conversion of parts of the G Zone to Residential Zone, may require further study. They also felt that some more information relating to the area affected by the proposals was also necessary. After discussion it was agreed that the proposals should be discussed in an informal meeting of non-official members with the officers of the BMRDA, when the necessary information relevant to the proposals, e.g. population, transportation and the type of industries permissible in the area in question, would also be furnished. After the informal discussion, a note would be put up for the consideration of the Authority at its next meeting.

Item No. 4 : Annual Work Programme for 1979-80.

The Authority considered the Agenda Note. The members suggested inclusion of the following additional proposals in the Work Programme for 1979-80 :-

I. WATER SUPPLY :

i) Hetawane Dam Project ...
ii) Water Supply to 25 villages within a distance of 1 to 1½ k.m. on both the sides of the pipe line from the Barvi Project.
iii) Water supply to Vasai, Virar, Bhiwandi, Bhayander and Padghe.

II. TRANSPORT & COMMUNICATIONS :

A) Station area traffic improvement schemes for -
   i) Thane,
   ii) Kalwa,
   iii) Nallasopara,
   iv) Virar.

B) Strengthening of the by-pass of Bhivandi Town.

C) Road overbridge on Santacruz-Chembur link road.

The Metropolitan Commissioner assured the members that the various suggestions made by them would be examined and that if it was found feasible to include any additional items in the Work Programmes for 1979-80, this would be done with the approval of the competent authority.

The Authority then passed the following

resolution.......

resolution :-

RESOLUTION 154 : Resolved that -

(a) the Annual Work Programme for 79-80, as outlined in the Agenda Note is approved; and

(b) the Standing Committee is authorised to accord approval to the details of the schemes included in the Annual Work Programme.

Item No. 5 : Authorisation for incurring expenditure in anticipation of the approval of the budget for 1979-80.

The Authority considered the Agenda Note. The members were assured that the budget estimates will hereafter be presented to the Authority by the prescribed date. The Authority then passed the following Resolution :-

RESOLUTION 155 : Resolved that the Authority authorises the Metropolitan Commissioner to incur expenditure on sanctioned posts, continuing schemes and on daily administration of the Authority's business, from the BMRD Fund, in anticipation of the approval of the Authority to the budget estimates for 1979-80.

Item No. 6 : Annual Report of the BMRDA for 1977-78.

The Authority considered the Agenda Note and passed the following Resolution :-

RESOLUTION 156 : Resolved that the Authority do approve the draft of the Annual Report of the BMRDA for 1977-78 and authorise the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government.

Item No. 7 : BMRDA Notification under Section 13 of the BMRDA Act, 1974.

The Authority considered the Agenda Note. The Chairman explained the implications of the BMRDA Notification and the urgency of the proposals for extension of the term of the Notification for further period of one year from the 10th June, 1979. The Authority then passed the following resolution -

RESOLUTION 157 : Resolved that the Authority, in exercise of its powers under sub-section (1) of Section 13 of the BMRDA

Act.......

Act, 1974 and all other powers enabling it in this behalf, approves of the issue of a Notification appended herewith (Annexure 'E') and authorises the Metropolitan Commissioner to have the same Notification published in the Maharashtra Government Gazette, duly authenticated by him in exercise of the powers under Section 7A of the said Act.

<u>Item No. 8</u> : <u>Station Area Traffic Improvement Scheme, Dombivli - Project Report.</u>

The Authority considered the Agenda Note. (Para 9 of the Agenda Note was substituted by the correction slip circulated at the meeting). The members welcomed the proposal. The Authority then passed the following resolution :-

<u>RESOLUTION 158</u> : In exercise of powers conferred by clause (c) of sub-section (1) of Section 12, read with Section 21A, of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974 and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby -

(1) approves the Station Area Traffic Improvement Scheme, Dombivli Railway Station, as detailed in the Project Report attached to the Agenda Note;

(2) recommends that the Government of Maharashtra and the Government of India should be moved to consider the scheme for grant of financial assistance under the Integrated Urban Development Scheme;

(3) sanctions, out of the Revolving Fund of the BMRDA, a loan of Rs.22.5 lakhs (approximate) to the Dombivli Municipal Council for implementation of the Station Area Traffic Improvement Scheme of Dombivli Railway Station, subject to the following conditions -

(a) in respect of the portion of the loan pertaining to works to be carried out by the Dombivli Municipal Council (approx. Rs. 13.6 lakhs) :-

| | |
|---|---|
| (i) Interest | : 9% per annum. |
| (ii) Period of repayment | : 10 years. |
| (iii) Instalments | : To be determined by the Metropolitan Commissioner. |

(b) in........

359

(b) in respect of the portion of the loan (approx. Rs.8.9 lakhs) pertaining to expenditure on the works to be carried out by the Central Railway :-

| | |
|---|---|
| (i) Interest | : Nil |
| (ii) Period of repayment | : As soon as the amount is received by the Dombivli Municipal Council from the Central Railway, but not more than 5 years from the date of the loan agreement between the Dombivli Municipal Council and the BMRDA. |

Resolved further that the Metropolitan Commissioner is authorised to determine other terms and conditions of the loan in consultation with the Dombivli Municipal Council.

Item No. 9; Acquisition of land for Area Development Scheme, Panchpakhadi, District Thane- Decision of the BMRDA Immovable Property Committee.

The Authority noted the Report of the BMRDA Immovable Property Committee.

Item No. 10 : Development of outlying areas of Bombay Metropolitan Region.

The Authority took note of the report on the assistance provided to the areas of the Bombay Metropolitan Region outside Greater Bombay.

Item No. 11 : Study of Water Potential and its Allocation in Bombay Metropolitan Region.

The Authority considered the Agenda Note. The Chairman, Water Resources Management Board, Shri N.G.K. Murty, explained the proposals regarding allocation of water resources for the Bombay Metropolitan Region and the priority of works to be done for meeting the demand in the Region. The Authority then passed the following Resolution :-

RESOLUTION 159 : Resolved that the allocation of water resources as recommended in para 11.23 of the Agenda Note, and financing of survey and investigation of projects to meet 1991 demand in Bombay Metropolitan Region in the given order of priority in paragraphs 11.24 and 11.25 of this Agenda Note are approved and are recommended to Government for further necessary action.

Item No. 12 : The BMRDA (Elections to Standing Committee) (Amendment) Regulations, 1978.

The Authority considered the Agenda Note and passed

the........

the following resolution :-

RESOLUTION 160 : In exercise of the powers conferred by Section 50 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby makes the BMRDA (Elections to Standing Committee) (Amendment) Regulations, 1978, as set out in Annexure (F).

Item No. 13 : Elections to the Standing Committee.

The Authority deferred the holding of elections to fill up the four vacancies on the Standing Committee.

Item No. 14 : Bombay Urban Transport Project-Inclusion of -

The Authority considered the Agenda Note and passed the following Resolution :-

RESOLUTION 161 : Resolved that the Authority approves the proposal that the 'Description of the Project' set out in Schedule 2 to the Loan Agreement be amended by the addition of a paragraph (6) under Part-A, to read as follows :-

"(6) Construction by BMC of access roads for the Dharavi bus depot and Wadala Heavy Workshop".

Resolved further that the Metropolitan Commissioner is hereby authorised to take the necessary steps in consultation with the World Bank to amend the Loan Agreement and to make the necessary changes in the Subsidiary Loan Agreement.

Item No. 15 : Development of Kurla Hill in Bandra-Kurla Complex as a picnic spot : suggestion from Shri E. Koparde, Member of the Authority.

Noted.

Item No. 16 : Revision of Zone Plan for Mira-Bhayander Complex.

The Authority considered the Agenda Note. The Municipal Commissioner observed that the Corporation is not in a position to augment the water supply at this stage and that the BMC had still to complete its examination of the proposals for augmentation of water supply to the Mira-Bhayander Complex. The Metropolitan Commissioner explained that as stated in the report on the revised Zoning Plan for Mira-Bhayander Complex (Annexure 'A' to item No. 16), it is proposed to develop the source of water supply for this area from the proposed reservoir at Chene. The Metropolitan Commissioner further explained that the original proposal contemplated revision of the Regional

Plan........

361

Plan in part for the Mira-Bhayander Complex under Section 16 of the M.R.T.P. Act, 1966. This would have been a time-consuming procedure. The revised draft Resolution, which was circulated at the meeting, proposed approval of the revised draft Zone Plan by the Authority, after which the State Government would be requested to undertake the proposal as minor modification under Section 20(2) of the said M.R.T.P. Act, 1966. This would enable the State Government to finalise the revised Plan expeditiously after inviting objections and suggestions in accordance with the procedure specified in the said Section 20(2).

The Authority then passed the following Resolution :

RESOLUTION NO.162 : Resolved that having considered Agenda Note No. 16 together with its enclosures, the Authority do approve of the Regional Plan for the Bombay Metropolitan Region, approved by the State Government by Government Notification No.RPB 1173/1136-RPC, dated the 2nd June, 1973, being modified in part limited to the area described as the Mira-Bhayander Complex and more particularly delimited on the plan placed on the Table.

Resolved further that it be recommended to the State Govt. that subject to its concurrence, the State Govt. may make the proposed modification in the Regional Plan for the Bombay Metropolitan Region as aforesaid in exercise of its powers under sub-section (2) of Section 20 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to move the State Govt. in this behalf.

Item No. 17 : Advances to CIDCO for reclamation of land and other infrastructural works for the Agricultural Produce Market at Turbhe in New Bombay.

Noted.

Item No. 18 : Loan to Maharashtra Water Supply and Sewerage Board for execution of Temporary Water Supply Scheme at Thal-Vaishet.

The Authority considered the Agenda Note and passed the following resolution :-

RESOLUTION 163 : Resolved that a loan of Rs.45 lakhs be sanctioned to the Maharashtra Water Supply and Sewerage Board for the execution of temporary water supply schemes for the proposed Fertilizer Complex at Thal-Vaishet near Alibag at the rate of interest of 10% to be paid six monthly and repayment of loan in four annual instalments commencing from 1979-80 and upto 1982-83.

-----------

p:26379.

Annexure 'A'...

363

ANNEXURE-A

**MEMBERS PRESENT AT THE SEVENTEENTH MEETING OF THE AUTHORITY, HELD ON THE 10TH MARCH, 1979**

| | |
|---|---|
| Shri Hashu Advani,<br>Minister for Urban<br>Development & BMRDA. | Chairman. |
| Shri Rajabhau Chimbulkar,<br>Mayor of Bombay. | Vice-Chairman. |
| Smt. Tarabai Vartak,<br>President of Thane<br>Zilla Parishad. | Member. |
| Shri T.H. Wajekar,<br>President of Kolaba<br>Zilla Parishad. | Member. |
| Shri K.P. Chhabria,<br>Chairman, BEST Committee, BMC. | Member. |
| Shri Eknath R. Koparde,<br>Councillor, BMC. | Member. |
| Shri B.D. Zute,<br>Councillor, BMC. | Member. |
| Shri Vinayak G. Dharap,<br>Councillor, BMC. | Member. |
| Shri Amarnath W. Patil,<br>Councillor, BMC. | Member. |
| Shri C.C. Bhujbal,<br>Councillor, BMC. | Member. |
| Shri Alimohmed Umar Memon,<br>Councillor, BMC. | Member. |
| Shri S.W. Patwari,<br>President, Dombivli<br>Municipal Council. | Member. |
| Shri D.K. Khanvilkar,<br>President, Alibag<br>Municipal Council. | Member. |
| Shri V.K. Patil,<br>Chairman, Panchayat<br>Samiti, Bhiwandi. | Member. |
| Shri Gajanan M. Koli,<br>M.L.A. | Member. |
| Shri D.N. Patil,<br>M.L.A. | Member. |
| Shri S.D. Baswant,<br>M.L.C. | Member. |
| Shri D.B. Sule,<br>M.L.C. | Member. |

Contd..on page 2....

| | |
|---|---|
| Shri L.S. Lulla,<br>Chief Secretary to the<br>Government of Maharashtra. | Member. |
| Shri B.K. Chougule,<br>Municipal Commissioner,<br>Municipal Corporation of<br>Greater Bombay. | Member. |
| Shri M.M. Wagle,<br>General Manager,<br>Bombay Telephones. | Member. |
| Shri N.G.K. Murti,<br>Chairman, Water Resources<br>Management Board, BMRDA. | Member. |
| Shri M.S. Palnitkar,<br>Metropolitan Commissioner,<br>Bombay Metropolitan Region<br>Development Authority. | Member-Secretary. |

INVITEES :

Managing Director,
City & Industrial Development
Corporation of Maharashtra Ltd.

Chief Executive Officer,
Maharashtra Industrial Development
Corporation.

Secretary to Government of
Maharashtra, Urban Development
Department.

ʃʃʃʃʃ

tms/16.3.79

365

ANNEXURE 'B'

## SEVENTEENTH MEETING OF THE BMRDA

Date : 10th March, 1979.

Speech of Chairman

I am happy to welcome you to this, the 17th Meeting of the Authority. The last meeting was held on the 26th September, 1978. There has been an unavoidable delay in calling this meeting as a number of vacancies of non-official members had to be filled up first.

2. Since the last meeting, a number of changes have taken place in the composition of the Authority. I take this opportunity to welcome the following new members of the Authority :

1. Shri R.K. Chimbulkar, Mayor and Vice-Chairman of the Authority.
2. Shri Prabhakar D. Niklankar, Chairman Improvements Committee.
3. Shri K.P. Chhabria, Chairman, B.E.S.T. Committee.
4. Shri Eknath Ramchandra Koparde, Councillor, B.M.C.
5. Shri V.G. Dharap, Councillor, B.M.C.
6. Shri A.U. Memon, Councillor, B.M.C.
7. Shri R.P. Laud, Councillor, B.M.C.
8. Shri C.C. Bhujbal, Councillor, B.M.C.
9. Shri D.G. Kamat, M.L.A.
10. Shri Dattatraya Narayan Patil, M.L.A.
11. Shri T.H. Vajekar, President, Kulaba Zilla Parishad.
12. Shri Krishnachandra, General Manager, Central Railway.
13. Shri K.S. Ramaswamy, General Manager, Western Railway.
14. Shri M.M. Wagle, General Manager, Bombay Telephones.

3. I also take this opportunity to place on record the services rendered by the following persons, who have ceased to be members of the Authority :

1. Shri Vamanrao Mahadik, Mayor.
2. Shri C.R. D'cruz.
3. Shri Hansraj Bhugra.
4. Shri Sudhir Joshi.
5. Shri M.S. Deora.
6. Shri M.A. Khandwani.
7. Shri M.R.N. Murthy, General Manager, Central Railway.
8. Shri M.G. Punoose, General Manager, Western Railway.
9. Shri M.M. Kini, General Manager, Bombay Telephone.

4. The........

4. The sad demise of Shri H.M. Wangare, President, Kulaba Zilla Parishad and of Dr. M.G. Parulekar, President of Vasai Municipal Council, has deprived the Authority of the services of two of its distinguished members. Both have been members of this Authority from its inception. We deeply mourn the premature passing away of the two members. I would like to place on record our appreciation of the services of the late Shri Wangare and Dr. Parulekar.

5. Since the last meeting, several developments of significance to the B.M.R. have taken place with which the BMRDA is vitally concerned, and to which I would like to refer briefly :-

Members must already be aware of the first step taken by the State Govt. in the programme for shifting of wholesale markets outside Bombay City, approved by the Authority. A new wholesale market in onions and potatoes was inaugurated by the Chief Minister at Turbhe-Vashi from the 26th January, 1979. The operation of the old market at Duncan Road had been discontinued by the State Government but the operation of the order has been stayed by an injunction given by the High Court.

A comprehensive water supply and sewerage scheme to provide water supply for municipal areas of Thane, Dombivli, Kalyan, Ulhasnagar and Ambernath and about 100 villages in the Region has been posed to the World Bank for assistance and is likely to be approved by them shortly.

The BMRDA has also undertaken preliminary studies for a number of projects such as the Truck Terminal at Wadala, the Inland Water Transport Project etc.

The scheme for the development of land in Bandra-Kurla Complex is progressing and the first lot of plots are being offered for sale by the BMRDA.

Another important event was the visit of the World Bank President Mr. McNamara to Bombay in October, 1978. During this visit a number of projects for development of infrastructure in the B.M.R. were presented to him. These include the Bombay Regional Urban & Rural Water Supply, the Truck Terminal at Wadala, Waste Collection and Disposal Projects, the Thane Creek Ulhas Water Way Project, projects for the extension of rail facilities to New Bombay. These

are........

These are at present under the consideration of the State Government.

I am also glad to inform the members that the draft Five Year Plan of the State Government for 1978-83 includes a provision of Rs.Twenty crores for the BMRDA.

6. The Agenda before the meeting includes some very important proposals, including the Annual Work Programme for 1979-80. The Agenda may now be taken up for consideration.

Vp:26379.

ANNEXURE : C

RESOLUTION

Shri H. M. Wangare, member of the Authority, has passed away. Shri H. M. Wangare had been a member of the Authority since the beginning. During this period he evinced a keen interest in the affairs and working of the Authority. The Authority wishes to place on record its appreciation of the services rendered by Shri Wangare and also its deep sense of loss as a result of his sad demise.

vp:26379.

ANNEXURE : D

RESOLUTION

Dr. M. G. Parulekar, member of the Authority, has passed away. Dr. M. G. Parulekar had been a member of the Authority since the beginning. During this period he evinced a keen interest in the affairs and working of the Authority. The Authority wishes to place on record its appreciation of the services rendered by Dr. Parulekar and also its deep sense of loss as a result of his sad demise.

Vp:26379.

371

ANNEXURE : E

NOTIFICATION

BY THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY
New Administrative Building, Madame Cama Road,
Bombay : 400 032.

No. :- WHEREAS the Bombay Metropolitan Region Development Authority has in exercise of its powers under sub-section (1) of Section 13 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act,1974 (Maharashtra Act No.IV of 1974) and all other powers enabling it in this behalf issued a Notification No.MC/RDM/3285/77, dated the 10th June, 1977 (hereafter referred to as "the said Notification");

AND WHEREAS the Bombay Metropolitan Region Development Authority considers it expedient to continue the said Notification for a further period of one year;

NOW, therefore, in exercise of its powers under sub-section (1) of Section 13 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act,1974 (Maharashtra Act No.IV of 1974), read with Section 21 of the Bombay General Clauses Act, 1904 (Bombay Act No.1 of 1904), and all other powers enabling it in this behalf, the Metropolitan Authority hereby directs that the said Notification shall continue to have effect for a further period of one year from the 10th June, 1979.

METROPOLITAN COMMISSIONER.

Bombay

Dated :

Vp:26379.

(373)

ANNEXURE : F

# THE BMRDA (ELECTIONS TO STANDING COMMITTEE) (AMENDMENT) REGULATIONS, 1978.

In exercise of the powers conferred by Section 50, read with sub-clauses (v) to (ix) of clause (a) of sub-section (1) of Section 6 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act,1974, and all other powers enabling it in this behalf, the BMRDA hereby makes the following Regulations :-

1. (i) These Regulations may be called the BMRDA (Elections to Standing Committee) (Amendment) Regulations, 1978.

   (ii) They shall come into force at once.

2. In Regulation 2 of the BMRDA (Elections to Standing Committee) Regulations, 1975, for clause (b), the following shall be substituted, viz. :-

   "(b) 'candidate' means a member, who is qualified to contest the election to the Standing Committee of the Authority in accordance with the respective provision of sub-clauses (v) to (ix) of clause (a) of sub-section (1) of Section 6."

3. Clause (d) of Regulation 2 shall be deleted.

Vp:26379.